**महत्वाचे**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी -४११ ०१८.
मुख्य लेखा परिक्षण विभाग,
क्र : मुलेप/६/कावि/ ५८/२०१६
दिनांक:- ११/०४/२०१६

**विषय:- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या लेखापरिक्षणातील प्रलंबित आक्षेपांच्या पुर्ततेबाबत...**

**संदर्भ :- १) इकडील अ.शा.पत्र क्र. मुलेप/१/कावि/११२/१४, दि. १२/११/२०१४**
**२) इकडील परिपत्रक क्र.मुलेप/१/कावि/१५३/१४, दि. २२/१२/२०१४**
**३) इकडील परिपत्रक क्र.मुलेप/१/कावि/९५/१४, दि. १३/०७/२०१५**

**परिपत्रक,**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम कलम १०५नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या विविध विभागांचे आर्थिक वर्षानुसार लेखा परिक्षणाचे कामकाज मुख्य लेखापरिक्षण विभागामार्फत करण्यात येते. सदर लेखापरिक्षणातील **प्रलंबित आक्षेपांची संख्या दि. ३१ जानेवारी २०१६ अखेर ३३१८२** एवढ्या प्रमाणात आहे. प्रलंबित आक्षेपांचे अनुपालन सर्व शाखाप्रमुखांनी वैयक्तिक लक्ष देवून व योग्य तो पाठपुरावा करून प्राधान्याने करणेबाबत उपरोक्त संदर्भिय १ व ३ अन्वये, तसेच शाखाप्रमुखांचे सभेतही वेळो वेळी सुचना दिलेल्या आहेत. **तथापि प्रलंबित आक्षेप, वसुलपात्र रकमा मोठ्या प्रमाणावर असूनही सर्व संबंधित शाखाप्रमुख आक्षेपांचे अनुपालन करणे संदर्भात उदासिन असल्याचे दिसून येते. प्रलंबित आक्षेप मोठ्या प्रमाणावर असल्याने वारंवार दैनिकामध्ये बातम्या प्रसिध्द होत आहेत. लेखापरिक्षणातील आक्षेपांची पूर्तता न करण्या-या अधिका-यांविरूध्द फौजदारी तसेच न्यायालयीन कारवाई करावी अशी मागणी स्वराज्य अभियान महाराष्ट्र या संस्थेने दि.३ मार्च, २०१६ चे पत्रान्वये केली आहे.**

सबब, प्रलंबित आक्षेप, वसुलपात्र रकमा या महानगरपालिकेच्या आर्थिक हिताशी निगडीत असल्याने प्रलंबित आक्षेपांची पुर्तता नियमित करण्यात यावी. यापुढे दरमहा **विभागाकडील प्रलंबित आक्षेपांपैकी २५% आक्षेपांची पुर्तता दरमहा लेखापरिक्षणास करण्यात यावी.** यासंदर्भात दर आठवड्याचे प्रत्येक सोमवारी अंतर्गत लेखापरिक्षक यांचेकडे लेखी स्वरूपातील अहवाल सादर करण्यात यावा. **अन्यथा यासंदर्भात आपले विरूध्द शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल, याची नोंद घ्यावी.**

**आयुक्त**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी ४११ ०१८

प्रति,

**शाखाप्रमुख्य**